**नियमित दिवाणी कब्जा क्र. १२३/२०१३ मधील नि.क्र. ११७ वरील आदेश**

( पारीत दिनांक – ०६/०२/२०२५)

श्री. सत्याप्पा गणपती गंदुगडे, वगैरे वि. श्री. अब्दुलसार मोहिद्दीन नदाफ, वगैरे

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, सदर दावा वादी यांनी प्रतिवादींविरुध्द हक्कज्ञापनासाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. दावेतील प्रतिवादी क्र. ३ तुकाराम कृष्णा केसरकर हे मयत झालेमुळे त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता वादीतर्फे नि. ११२ वर अर्ज दिला होता. त्या अर्जानुसार प्रतिवादी क्र. ३ यांची मुलगी मंगल तुकाराम केसरकर असे नमुद करणेत आले होते व बेलीफमार्फत नोटीसा पाठविणेत आलेल्या होत्या. प्रतिवादी क्र. ३ यांचे वारसातर्फे दाखल केलेल्या वकीलपत्रामध्ये, पत्तामेमो मध्ये प्रतिवादी क्र. ३ यांची मुलगी सौ. प्रज्ञा प्रकाश भालेकर असे नमुद केले आहे. प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस प्रतिवादी क्र. ३–क सौ.प्रज्ञा प्रकाश भालेकर असे दाव्याच्या टायटल कॉलममध्ये तशी दुरुस्ती करुन मिळण्याबाबत सदरचा दुरुस्ती अर्ज दाखल करण्यात आला आहे.

३. सदरील अर्जास प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे अर्जाच्या खालील बाजूस दाखल केलेले असून वादी हे याकामी विलंब करीत आहेत. त्यामुळे, अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले.

५. अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुत प्रकरणी दावा हा हक्कज्ञापनासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रस्तुत प्रकरणातील दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस प्रतिवादी क्र. ३–क सौ.प्रज्ञा प्रकाश भालेकर असे दाव्याच्या टायटल कॉलममध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे. अर्जातील नमुद कारणांचा विचार करता तसेच दुरुस्तीच्या स्वरुपाचा विचार करता सदरची दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याचे

स्वरुप बदलेल असे निश्चितच वाटत नाही. सबब, दुरुस्तीचा व अर्जातील नमुद कारणांचा विचार करता सदरचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहेः–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र.११७) वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रु. ३००/– खर्च (cost) स्वरुपात देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) वादीनी मंजूर दुरुस्ती अर्जाप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करुन घ्यावी व दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2025.02.10 17:22:19 +0900

कागल. **(प्रणिता एस.पाटील)**

दिनांक – ०६/०२/२०२५ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.